# - प्रेस नोट -

दि. ०२/०६/२०२६

## <u>देवनार पोलीस ठाणे - खुनाचा प्रयत्न</u>

दि. ३१/०५/२०२६ रोजी २०.३० वा. च्या सुमारास फिर्यादी हसमत अली रेहमतउल्ला सावत, वय-४१ वर्षे, धंदा -लाकुड व्यवसाय, रा. ठी. गोवंडी, व त्यांचे मित्र हैदरअली सावत वय-५५ वर्ष हे घरी जात असताना शकील चिकन शॉप, इमाम वाडा जवळ, डॉ.झाकीर हुसैन नगर, गोवंडी, मुंबई येथे चिकन शॉप चालक शकील व त्यांच्याच दुकानात काम करणारा विधीसंघर्षग्रस्त बालक यांचे भांडण सोडवण्यासाठी गेले असता त्याचा राग विधीसंघर्षग्रस्त बालक यास आल्याने तेथे असलेला चिकन कापण्याचा सत्तुर हातात घेवून फिर्यादींच्या डाव्या हातावर व डोक्यावर वार करून फिर्यादींना गंभीर जखमी करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि. ०१/०६/२०२६ रोजी गु.र.क्र.३५७/२६, कलम १०९(१),३५२ बीएनएस २०२३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

---------------------